महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी कार्यालय जळगाव.

(भूसंपादन शाखा)

दुरध्वनी क्र. ०२५७-२२३५००५ Email ID : plaqjalgaon@gmail.com

क्रमांक:भूसं.स्वांय/भू.अ.क्रमांक/ 34465/2020 /एसआर 49/16 दिनांक: 9 .10.2020

प्रती,
उपविभागीय अधिकारी
फैजपूर भाग, फैजपूर

उपविभागीय अधिकारी फैजपूर भाग ... कार्यालय फैजपूर
दि. 14 OCT 2020
संकलन
आवक 587/2020
संकलन
ना.त. उ.वि.अ.

विषय :- भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम कलम 19 (7) अन्वये मुदतवाढ बाबत.

संदर्भ :- आपले कडील पत्रक्र.भूसंपादन/एसआर/49/2016(जुना 23/2007) दि.07.08.2020

मौजे पाडळसे खु. ता.यावल जि.जळगांव येथील एकुण गट 36 आहेत. त्यांचे क्षेत्र एकुण क्षेत्र 09 हेक्टर 0.62 आर. मौजे पाडळसे ता.यावल जि.जळगांव येथील शेळगांव वॅरज अंतर्गत बुडीत होणारे क्षेत्राचे संपादन करण्यासाठी भुमिसंपादन, पुनर्वसन व नुर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013 नुसार कलम 19 ची अधिसुचना क्रमांक भूसंपादन/मौजे पाडळसे/एसआर-49/2015 (जुना एस.आर.23/2007) यापूर्वी दिनांक मार्च 28 ते एप्रिल 03, 2019 अन्वये अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध केली.

का.अ.
उप का.अ.
वि.ले.
शाखा
आवक क्र. 4632
दिनांक 24/11/20

उक्त अधिसूचना प्रसिद्ध झालेपासून 12 महिन्याचे आत म्हणजेच दि.03/04/2020 पावेतो निवाडा प्रसिद्ध होणे आवश्यक होते. तथापि, प्रस्तुत भूसंपादन कार्यवाही सुरू असतांना जागतीक महामारी कोविड-19 चा प्रादुर्भाव झाल्याने तसेच फैजपूर उपविभागात सदर महामारीचा फैलाव रोखणेकामी उपविभागीय अधिकारी फैजपूर भाग, फैजपूर हे इंसिडन्ट कमांडर म्हणून कोवीड-19 चे कामात व्यस्त असल्याने तसेच दुय्यम निबंधक कार्यालय सावदा बंद असल्याने खरेदी-विक्री दस्त प्राप्त करून घेता आले नाही. त्यामुळे प्रकरणात जमीनींचे मुल्यांकन तयार करून दिनांक 03/04/2020 पर्यंत निवाडा प्रसिद्ध करता न आल्याबाबत उपविभागीय अधिकारी फैजपूर भाग, फैजपूर यांनी मुदतवाढ प्रस्ताव सादर केलेला आहे.

Scanned with CamScanner

भूसंपादन अधिनियम, 2013 मधील कलम 19 (7) नुसार, समुचित शासनाच्या मते, जर कालावधी वाढविण्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, त्याला बारा महिन्याच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल, तसेच कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय, लेखी स्वरूपात नोंदविण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर टाकण्यात येईल, असे नमूद आहे.

सबब, उक्त अधिनियमाच्या कलम 19 (7) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये क्रमांक भूसंपादन/मौजेपाडळसे/एस.आर/49/2016 (जुना 23/2007) या भूसंपादन प्रकरणात उपरोक्त बाबी विचारात घेता भूसंपादनाची कार्यवाही पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी फैजपूर भाग, फैजपूर यांना या अधिसुचनेच्या दिनांकापासून 06 (सहा) महिन्याची मुदत वाढ देण्यात येत आहे.

(अभिजीत राऊत)
जिल्हाधिकारी,जळगांव

Scanned with CamScanner